तरुणाई बोलणार **सडेतोड**

# क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धा
२०२४

प्रति,
मा. ______________________

______________________

______________________

**आपले नम्र**

**मा.श्री. शरदभाऊ लाड**
चेअरमन, क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी. बापू लाड
सहकारी साखर कारखाना लि., कुंडल

**मेजर डॉ. आर. एस्. डुबल**
प्राचार्य, क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी. बापू लाड
महाविद्यलय, कुंडल

**नावनोंदणी**

Email: kgdblm@gmail.com रजिस्ट्रेशनसाठी QR Code:

Register Here!!

**समन्वयक**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा.डॉ. धनंजय होनमाने | डॉ. प्रविणकुमार लुपणे | प्रा. भारती सुतार | प्रा. धनश्री माने |
| ९८९०२१३७३८ | ९८९०४३०४५५ | ७७९८७७९२५७ | ९०६७२६१७५७ |

**स्पर्धा वेळ: मंगळवार, दि.२० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता**

**स्थळ:-क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल, ता. पलूस, जि. सांगली**

Mudra,Palus/9579504949






स. न. वि. वि.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात साताऱ्च्या प्रतिसरकारच्या चळवळीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी. बापू लाड हे प्रतिसरकारच्या तुफान सेनेचे फिल्डमार्शल होते. त्यांच्या खंबीर नेतृत्वाखाली गुंडशाही, सावकारकी व जमिनदारी समूळ नष्ट झाली. तंटामुक्ती, दारुबंदी व अस्पृश्यता निवारण यासारख्या उपक्रमातून ही चळवळ समाजाभिमुख झाली. समाजाधिष्ठित व नैतीक मूल्यांच्या पायावर समाज उभा रहावा व राष्ट्रीय मूल्यांची वृध्दी व्हावी यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले. शिक्षण, सहकार, कृषी, राजकीय व सामाजिक क्षेत्रामध्ये त्यांनी मुलगामी स्वरुपाच्या विचारांचे प्रबोधन करून रचनात्मक कार्यही केले. क्रांतिअग्रणींच्या विचारांचा व कृतीचा वारसा घेऊन महाविद्यालयीन तरुणांना वैचारिक अभिव्यक्तीचे एक समर्थ व्यासपीठ मिळवून देण्याच्या परिप्रेक्षातून क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. तरी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या वैचारिक मंथनात सहभागी होण्यास प्रवृत्त करावे ही विनंती...

क्रांति अग्रणी सातवे क्रांतिपुष्प वक्तृत्व स्पर्धा २०२४

## उद्घाटन समारंभ

मंगळवार, दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी,
ठीक सकाळी १०.०० वाजता

**उद्घाटक**

**मा. सुषमा अंधारे**
ख्यातनाम व्याख्यात्या

**अध्यक्ष**

**मा. आमदार श्री.अरुणअण्णा लाड**
सदस्य विधान परिषद, महाराष्ट्र राज्य

**स्वागताध्यक्ष**

**मा.श्री. शरदभाऊ लाड**
चेअरमन, क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी. बापू लाड
सहकारी साखर कारखाना लि., कुंडल

## स्पर्धेचे विषय

- स्वातंत्र्य योद्ध्यांनो तुम्ही पुन्हा जन्माला या..
- प्रज्ञावंतांचे राष्ट्रप्रती उत्तरदायित्व
- खरंच! सोनं पांघरून चिंध्या विकणारांची संख्या वाढतेय ...
- रंग
- धर्माचे राजकारण आणि राजकारणाचा धर्म
- संत कबीर : भारताचा सामाजिक नायक
- आदर्श आणि तरुणाई

क्रांति अग्रणी सातवे क्रांतिपुष्प वक्तृत्व स्पर्धा २०२४

## पारितोषिके

**पदवी व पदव्युत्तर विभाग**

- प्रथम क्रमांक - १५०००/ सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- द्वितीय क्रमांक - १३०००/ सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- तृतीय क्रमांक - ९०००/ सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- चवथा क्रमांक -७०००/ सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- पाचवा क्रमांक -५०००/ सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- उत्तेजनार्थ १) ३०००/ प्रमाणपत्र
- उत्तेजनार्थ २) २०००/ प्रमाणपत्र



**ज्युनिअर विभाग**

- प्रथम क्रमांक - ९०००/ सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- द्वितीय क्रमांक -७०००/सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- तृतीय क्रमांक -५०००/सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- चवथा क्रमांक - ३०००/सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- पाचवा क्रमांक - २०००/ सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
- उत्तेजनार्थ १) १०००/ प्रमाणपत्र
- उत्तेजनार्थ २) १०००/ प्रमाणपत्र

## स्पर्धेचे नियम

- ज्युनिअर व पदवी पदव्युत्तर विभागाचे विषय समान असतील. पण गुणानुक्रम विभागानुसार देण्यात येतील .
- स्पर्धेची वेळ ५+२=७ मिनिटांचा असेल .
- स्पर्धा मराठी भाषेत होईल .
- स्पर्धकाजवळ महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे बंधनकारक आहे.
- प्रत्येक स्पर्धकांची नोंदणी फी. १००/ राहिल.
- क्रमांक विभागून दिला जाणार नाही.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.
- नावनोंदणी क्युअर कोड वरून गुगल फॉर्म भरणे आवश्यक आहे.
- नावनोंदणी १८ ऑगस्ट २०२४ पर्यंतच सुरू असेल .